सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्र

सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र

फेब्रुवारी-२०२२ वर्ष -३, अंक-४

कार्यालय - संत एकनाथनगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कौंप्युटर ट्रेनिंग सेंटर , बिबवेवाडी,, पुणे - ४११०३७

## रौप्य महोत्सवी वर्ष कार्यक्रम

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्रने, २५ वर्ष पूर्ण केली आहेत. त्यानिमित्ताने रौप्य महोत्सवी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी दिनांक ८/२/२२ रोजी पुणे वनविभागाच्या विश्रामगृहात सर्वश्री. शिरीष अस्थाना एम.एम. कुलकर्णी व उमेश धोपेश्वरकर यांची बैठक झाली व त्यात खालीलप्रमाणे नियोजन केले आहे.

१) दि. २१-३-२२ रोजी वेळ १४.३० ते ५.३० वाजेदरम्यान वन सभागृह, वन भवन, गोखले नगर, पुणे येथे सेवक संघाची सन २०२१-२२ साठीची वार्षिक सर्व साधारण सभा श्री. शैलेंद्र बहादूर, विश्वस्त यांचे अध्यक्षतेखाली होईल. या वार्षिक सभेचा अजेंडा लवकरच संघ सचिव यांच्याकडून निश्चित केल्या जाऊन वितरित करण्यात येईल. त्यानंतर १६.३० ते १७.३० वाजेदरम्यान त्याच ठिकाणी रौप्य महोत्सवी कार्यक्रमाचे शानदार उद्‌घाटन करण्यात येईल. सदर कार्यक्रमाचे तपशीलवार नियोजन कार्यकारी अध्यक्ष श्री. एम.एम. कुलकर्णी यांच्याकडून लवकरच करण्यात येत असून त्या संबंधात सर्व अधिकार त्यांना अध्यक्ष, सेवक संघ यांनी प्रदान केलेले आहेत. सदर कार्यक्रमात सेवक संघाचे काही माननीय माजी सदस्य आणि कार्यरत पदाधिकारी यांचा विशेष सत्कार करण्याचे नियोजित आहे. त्यांची नावे कार्यकारी समितीच्या मान्यतेने लवकरच निश्चित करण्यांत येत आहेत. सदर कार्यक्रमात द्यावयाचे स्मृतिचिन्ह व इतर तपशीलदेखील श्री. कुलकर्णी यांच्या मार्फत ठरविण्यात येत आहेत व त्यास कार्यकारी समितीकडून मान्यता दिली जाईल. तसेच रौप्य महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन देखील करण्यात येईल सदर कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी व अध्यक्ष यांची नावे निश्चित करण्याची जबाबदारी श्री. कुलकर्णी यांनाच सोपविण्यात आली आहे. सदर कार्यक्रमासाठी सुमारे ५० जण उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. त्यासाठी खर्चाचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे. कार्यक्रम दरम्यान अल्पोपहार देण्यात येईल. ज्यांना सभेत समक्ष हजर राहता येणार नाही, त्यांच्यासाठी गुगल मीटवर सहभागी होता येईल.

## सेवक संघ विशेष वृत्त.

### अमरावती शाखेच्या माध्यमातून कार्यशाळेचे आयोजन

सेवक संघाच्या अमरावती शाखेच्या माध्यमातून अग्नी संरक्षण या विषयावर अकोला वनविभागात दि. ९.२.२०२२ रोजी कार्यशाळा घेण्यात आली. त्यात वन रक्षक ते उप वन संरक्षक सर्व हजर होते श्री. संजय जगताप यांनी मार्गदर्शन केले. श्री. जगताप यांचे सेवक संघ कार्यकारी समितीकडून हार्दिक अभिनंदन.



### "हवामान बदल" संबंधी प्रशिक्षण सदस्यांकडून यशस्वीरित्या पूर्ण

अमेरिकन कॉन्सुलेट जनरल,मुंबई यांच्यामार्फत हवामान बदल संबंधी इंग्रजी भाषेतून १०आठवडयांचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यात Climate Reality Project - India यांचे शिफारशीवरून सेवक संघ सदस्य श्री. एस. के. गवळी व श्री. जी. पी.गरड यांची निवड करण्यात आली होती. हे प्रशिक्षण सेवकच्या सदस्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले बद्दल त्योना सर्टिफिकेट ऑफ ॲचिवमेंट प्रदान करणेत आले.


CERTIFICATE

OF ACHIEVEMENT

THIS CERTIFICATE IS PROUDLY PRESENTED TO

Sambha Gawali

English for Professional Expression

अंकात . . . . .

१. रौप्य महोत्सवी वर्ष कार्यक्रम ... .......१
२. अमरावती शाखेच्या माध्यमातून ..... ..१
कार्यशाळेचे आयोजन
३. "हवामान बदल" संबंधी प्रशिक्षण सेवक सदस्यांकडून यशस्वीरित्या पूर्ण .. .. ....१
४. कॅम्पा निधी अंतर्गत रोपवनाचे .........१
मूल्यांकन काम
५. कन्हारगावचा आराखडा सादर..... ..१
६. कार्यकारी मंडळ बैठक वृत ... ..... ... .२
७. वृक्ष गणनेसाठी संगणकीय ....... ... .२
प्रणाली तयार करणार
८..निधन वार्ता ... ... .. .. ... ... ... २

सेवक संघास कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले होते. सदर आराखडा चमूने पूर्ण केला असून हा २०६ पानी पाच वर्षाचा आराखड्याचे प्रारूपास श्री. विश्वास सावरकर यांनी अंतिम करून प्रमुवसं (वन्यजीव) म.रा.तथा मुख्य वन्यजीव रक्षक महाराष्ट्र राज्य यांना अभिप्रायार्थ सादर करणेत आला. अभिप्राय प्रतिक्षित.

----------oooo-------------------

## सेवक संघ वृक्ष गणना कामासाठी संगणकीय प्रणाली तयार करणार

काही आठवड्यांपूर्वी धुळे शाखा चाळीसगाव नगरपरिषदेच्या वृक्ष गणनेच्या कामासाठीच्या निविदा प्रक्रियेत सहभागी झाली होती. तथापि सदर निविदा अटीप्रमाणे वृक्ष गणना कामासाठी संगणकीय प्रणालीचा वापर करणे नमूद होते. या अटीची पूर्तता करू न शकल्याने सेवक संघासोबत इतरही सर्व निविदा रद्द करण्यात आल्या. सद्यस्थितीत महाराष्ट्रातील सर्व महानगर पालिका व नगर परिषदा या आता वृक्ष गणनेचे संगणकीय प्रणालीचा वापर करूनच काम करण्याचे नियोजित करत असल्याने त्यासाठी सेवक संघाने स्वतःचे सॉफ्टवेअर विकसित करण्याचे काम तज्ञ्यामार्फत हाती घेतले आहे. सॉफ्टवेअर तयार झाल्यास सेवक संघ वृक्ष गणनेचे कामामध्ये सक्षमरित्या सहभागी होऊ शकेल.

******************************

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाची १फेब्रुवारी नियोजित आभासी बैठकी केंद्रीय बजेटमुळे दि.८-२-२०२२ होउन खालील विषयावर चर्चा झाली.

१) दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करणे -श्री.संभाजी गवळी
२) कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडा आढावा - श्री.भगत, प्रकल्प समन्वयक.
३) सेवक संघ रौप्य महोत्सवी कार्यक्रम स्थान स्वरूप नियोजन - श्री. शिरीष अस्थाना.
४) सेवक संघाच्या आतापर्यंतच्या वाटचालीत विशेष योगदान देणाऱ्या सदस्यांना सेवक श्रेष्ठ म्हणून योग्य त्या पदकाने गौरविणे.
५) नवीन कामांचा शोध आणि संकल्पना - श्री. शिरीष अस्थाना
६) वस्तू व सेवा कर भरणा आणि त्यासाठी सनदी लेखापाल व्यतिरिक्त इतर व्यावसायिकयांचा शोध व नियुक्ती - श्री.धोपेश्वरकर.
७) सेवक संघाचा मासिक रोखलेखा आणि धनादेशद्वारे शोधन रक्कम अदा करणे बाबत- श्री. विवेक डावरे.
८)रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांक तयार करणे प्रगती - श्री. एम्. एम्. कुलकर्णी
९) सेवक संघ अमरावती शाखा सह अध्यक्ष निवड - श्री.संजय जगताप.
१०) आयत्या वेळीचे विषय.

-----------------oooo-------------

## निधन वार्ता

चालू महिन्यात खालील व्यक्तींचे निधनाचे वृत्त प्राप्त झाले.
(१)श्री. आर. के. मुखर्जी, सेनि, सवस.
(२)श्री.भगवान ठाकूर, एफडीसीएम.
(३)श्रीमती रश्मी मुठे, श्री. मा. ल. मुठे, सेनि उवसं यांच्या कन्या
(४) श्री शंकर धोटे सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी, परतवाडा विठ्ठलवाडी निधन दिनांक १५-२-२०२२
(५) अतिकुर रहीम, सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी, निधन दिनांक १६-२-२०२२
(६) श्री. डी. बी. बेंडकुळे, वनक्षेत्रपाल वन संशोधन केंद्र, नवापूर यांचे दि.२-२-२०२२ किडनीचे आजाराने दुखद निधन झाले.



ईश्वर वरील सर्वांचे आत्म्यास सद्गती देवो आणि शांती प्रदान करो ही प्रार्थना व सेवक संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

विश्वविख्यात गायन सम्राज्ञी, भारतरत्न लता मंगेशकर यांचे दि.६-फेब्रु. २२ रोजी निधन झाले. त्यांना सेवक संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

---------------------------------

## सेवक संघ विशेष वृत्त.

श्री. वि. त्र्यं. पत्की, सेवक संघ जेष्ठ मार्गदर्शक यांनी श्री. गजेंद्र हिरे उवसं, ठाणे वन विभाग यांचेशी ठाणे वन वृत्तातील (1) Maharashtra Felling of Trees(Regulation) Act,1964 (2) Maharashtra Sale of Trees by Occupants belonging to Scheduled Tribes(Regulation) Act,1969 या वन कायद्यांचे तरतूदीच्या अंमलबजावणी पच्यात संनियंत्रणाच्या मुल्यांकनाची गरज व महत्व याबाबत चर्चा करून हे काम सेवक संघामार्फत करण्याची तयारी दर्शविली.उवसंकडून याकामी सकारात्मक प्रतिसाद अपेक्षित आहे.

********************************

## सेवक संघ अमरावती शाखा अध्यक्षपदी पुन्हा श्री.संजय जगताप

सेवक संघ अमरावती शाखेचे अध्यक्षपदी पुन्हा श्री.संजय जगताप शाखेचे सभेत निवड करण्यात आली आहे. श्री.गडपांडे यांनी वैयक्तिक अडचणींमुळे अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता.

********************************

## नवी लेख मालिका

जानेवारी २०२२ अंकापासून "सेवक संघाचे सेवेकरी " ही नवी लेख मालिका सुरू करणेत आली आहे. यात सेवक संघाचे जडणघडणीत गेल्या २५ वर्षात ज्या सदस्यांनी मोलाचे योगदान दिले, त्यांच्या कामाबाबत ओळख करून देण्यात येत आहे.
त्याअंतर्गत भाग -२

"सेवक संघाचे सेवेकरी "

श्री वसंत जोशी - एक सेवक संघ इतिहास पुरूष पुढील अंकात प्रकाशित करणेत येईल.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी